# राज्य निवडणूक आयोग

## महाराष्ट्र

१ ला माळा, नवीन प्रशासकीय भवन, हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मुंबई- ४०० ०३२.

---

(प्रसिद्धिपत्रक) दि. ०३ एप्रिल २०१८

**ग्रामपंचायतींच्या प्रारूप मतदार याद्यांची**
**१८ एप्रिल रोजी प्रसिद्धी**

मुंबई, दि. ३: विविध जिल्ह्यांतील जून २०१८ ते सप्टेंबर २०१८ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित सुमारे ६७० ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक; तसेच रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांसाठी १८ एप्रिल २०१८ रोजी प्रारूप मतदार याद्या प्रसिद्ध करण्यात येणार आहे, अशी माहिती राज्य निवडणूक आयुक्त ज. स. सहारिया यांनी आज येथे दिली.

श्री. सहारिया यांनी सांगितले की, विधानसभा मतदार संघाच्या १० जानेवारी २०१८ रोजी अस्तित्वात आलेल्या मतदार याद्या या निवडणुकांसाठी ग्राह्य धरण्यात येणार आहे. त्याआधारावर ग्रामपंचायतींच्या प्रारूप मतदार याद्या १८ एप्रिल २०१८ रोजी प्रसिद्ध केल्या जातील. त्यावर १८ ते २३ एप्रिल २०१८ या कालावधीत हरकती व सूचना दाखल करता येतील. अंतिम मतदार याद्या २५ एप्रिल २०१८ रोजी प्रसिद्ध होतील.

0-0-0

(Jagdish More, PRO, SEC)